# मिळून साऱ्याजणी


PUNE | वर्ष सतरावे | अंक आठवा | मार्च २०१८ | पृष्ठसंख्या ६० | किंमत ₹ ५०/-

## स्त्रियांचा दडपलेला इतिहास उजागर करुया...

...विद्यादेवी सावित्रीबाई रोडे
तानुबाई बिर्जे
शांताबाई दाणी



विमल रणदिवे



डॉ. रखमा राऊत



शांताबाई कांबळे



जाईबाई चौधरी
साळुबाई तांबवेकर
रजिया जफार रहमतुल्ला
गीताबाई गायकवाड...

स्त्रियांनी आणि पुरुषांनी स्वतःशी आणि परस्परांशी संवाद साधावा यासाठी...

मार्च २०१८, वर्ष सतरावे, अंक-सातवा
फाल्गुन/चैत्र शके १९३९
www.miloonsaryajani.in

# मिळून साऱ्याजणी

पानोपानी
आरंभ
ऑगस्ट १९८९
मार्च २०१८

**मुख्य संपादक**
विद्या बाळ
**संपादक**
गीताली वि. मं.
**संपादन साहाय्य**
पूनम बा. मं.
**कार्यालयीन व्यवस्थापन**
मानसी घाणेकर
प्रगती सावंत, रणजित काळे
संगीता माझिरे, भारती सुपेकर
**मुखपृष्ठ छायाचित्र**
नेटवरून साभार
**मुखपृष्ठ मांडणी**
प्राइम पुणे
**अंक जुळणी - अंक मांडणी**
मंगेश कुडले
**आतील सुलेखन व चित्रे**
राजू देशपांडे, शेखर गोडबोले,
जगदीश पाटील, श्रीधर अंभोरे
आणि नेटवरून साभार
**मुद्रितशोधन**
प्रशांत सिदवाडकर आणि साऱ्याजणी
**अक्षरजुळणी**
नीला देशपांडे
**कार्यालयाचा पत्ता**
'मिळून साऱ्याजणी'
४०/१/ब, भोंडे कॉलनी, कर्वे रोड,
पुणे - ४११००४.
Email : saryajani@gmail.com
**वर्गणी व अंकासंबंधी चौकशी**
०२०-२५४३३२०७
**संपादकीय विभाग** - ०२०-२५४५४८३५
**कार्यालयीन वेळ**
सोम. ते शुक्र. दु. १२ ते ५

**वार्षिक वर्गणी**
व्यक्तिसाठी ५०० रु. / संस्थेसाठी ७०० रु.
(अधिक तपशील पान क्र. ९ वर)

**संवाद** / गीताली / ४
**विशेष ओळख**
**सायंटिस्ट आजी : डॉ. कमल रणदिवे** / मिलिंद बोकील / ६
**जगण्या-लिहिण्यात एकवाक्यता साधणारी : विमुक्ता कृष्णा सोबती** / शोभा नाईक / १२
**आरपारावलोकिता** /
विद्युत भागवत / १६
**'द यलो वॉलपेपर'**
**एका घुसमटलेल्या स्त्रीमनाची वेदना** / वैशाली जोशी / २०
**कथा**
**नकुशी** / जगदीश पाटील / २२
**नर- मादी ते स्त्री-पुरुष**
**...परत एकदा नर-मादी ते स्त्री-पुरुष** / मिलिंद वाटवे / २६
**भाषा जीवनाच्या काठाने**
**जोखीम आणि श्रीमंती** /
मृणालिनी वनारसे / २८
**झुंजूमुंजू**
**कलंकित जगणे : विदर्भातील आत्महत्याग्रसत शेतकरी विधवांच्या व्यथा** / सुवर्णा दामले / ३२
**मुस्लिम मनाचा कानोसा**
**'मुस्लिम मुलींचे शिक्षण : धार्मिक आणि शालेय'** / तमन्ना इनामदार / ३४
**कविता** - श्रीपाद भालचंद्र जोशी, उषा परब, आश्लेषा महाजन, दाक्षायणी पंडित / ३६
**तरुण.कॉम**
**स्त्री पुरुष समतेसाठी दोन कलमी कार्यक्रम** / मयूर अरुण जयवंत / ३८
**स्त्रियालिटी**
**रचना विरुद्ध पुनर्रचना** /
जयदेव डोळे / ४०
**स्त्रियांची वाढती व्यसनाधीनता...** /
प्रतिभा राऊत-सोनावणे / ४२
**बळीराजा राणीचं चांगभलं**
**कविता** - ज्ञानेश्वर बाविस्कर / ४३
**खेलेंगे जितेंगे**
**'फुलराणी' पुन्हा फॉर्मात ?** /
सीमा भानू / ५३
**आपल्या वाचनालयात**
सुप्रिया सहस्रबुद्धे, आशा साठे / ५६
**वाचणारे लिहितात** / ५७
**प्रतिनिधी यादी** / ५८



आमचे वितरक : संदेश एजन्सी : २४४५९३६१/६६०२१३४० पूनम एजन्सी : २४४९४६६८,
बी. डी. बागवे आणि कंपनी, मुंबई : २३८५७०१२ पाठक ब्रदर्स : नाशिक २५०६८९८
नागपूर - २४२०२९३, जळगाव : २२२८८०६

महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकास अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व राज्य शासन सहमत असेलच असे नाही. अंकात प्रसिद्ध केलेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. निरामय पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टच्या मालकीचे मिळून साऱ्याजणी मासिक मुद्रक, प्रकाशक गीताली वि. मं. यांनी युनिक ऑफसेट, १५२३, सदाशिव पेठ, आनंदशिल्प, पुणे ४११०३० येथे छापून ४०/१/ब, भोंडे कॉलनी, कर्वे रोड, पुणे ४११००४ येथे प्रसिद्ध केले. संपादक-गीताली वि. मं.

# जगण्या-लिहिण्यात एकवाक्यता साधणारी : विमुक्ता कृष्णा सोबती

शोभा नाईक

**अनोखी आधुनिक दृष्टी असणाऱ्या कृष्णा सोबती यांच्या साहित्यात व्यापकता आणि सामाजिकता यांचा सुरेख मेळ आहे. स्त्रियांचं पारंपरिक शोषण चित्रित करून त्या थांबत नाहीत तर त्या वास्तवामागची कारणमीमांसा नेमकेपणानं करतात. जगण्यात आणि लिहिण्यात एकवाक्यता म्हणजे नैतिकता असं त्या मानतात. त्यांचं निर्भीड, लखलखीत पारदर्शी, स्वतंत्र आणि स्वयंसिद्ध व्यक्तित्व त्यांच्या लेखनातून आरपार झिरपत जातं. त्यांच्या स्त्रीप्रधान संहितांमधून समाज आणि ईश्वर या पारंपरिक नियंत्रणाच्या पाशातून पूर्णपणे बाहेर आलेल्या, मुक्तीचा गांभीर्यानं विचार करणाऱ्या नायिका आहेत. आपल्या हक्कांसाठी लढताना त्या कर्तव्याबाबतही दक्ष आहेत. समाजातलं स्त्री-पुरुषांमधलं श्रेष्ठत्व-कनिष्ठत्व नाकारून परपस्परपूरकतेनं दोघांनाही माणूसपणाची वाटचाल सुकर करून देणारं त्यांचं लेखन आहे. नव्वदी पार केलेल्या, ज्ञानपीठ पुरस्कारानं गौरवलेल्या या विदुषीला साऱ्याजणीचा त्रिवार सलाम !**



गेल्या चार पाच दशकांमध्ये हिंदी साहित्यात सतत प्रभावीपणाने आपल्या ठसठशीत अस्तित्वासह वाटचाल करत असणाऱ्या; अनेक प्रतिष्ठित पुरस्कारांच्या मानकरी असणाऱ्या प्रख्यात लेखिका कृष्णा सोबती यांना २०१७ सालचा त्रेपन्नावा ज्ञानपीठ पुरस्कार प्राप्त झाला. त्या निमित्ताने त्यांच्या सन्माननीय ठरलेल्या विलक्षण व्यापकतेने समृद्ध असणाऱ्या निधड्या लेखणीची वैशिष्ट्य लक्षात घेण्याचा आपण प्रयत्न करू.

केवळ भारतीयच नव्हे तर एकूणच वैश्विक साहित्यात आपली मुद्रा उमटवून असलेल्या हिंदी साहित्यास अनेक आयामांनी युक्त करणाऱ्या कृष्णा सोबती यांचा जन्म २५ फेब्रुवारी १९२५ साली आजच्या पाकिस्तानातील गुजरात मध्ये झाला. भारत पाकिस्तान फाळणी काळात त्यांच्या कृषी संस्कृतीतील कुटुंबास स्थलांतरित व्हावे लागले. कृषी संस्कृती आणि जन्मभूमी यांची जी घट्ट वीण असते ती या लेखिकेत लेखनाला आवश्यक असणारी अस्वस्थता सतत जागृत ठेवत राहते असे वाटते. एका अस्वस्थ पर्वातून पुढे कालक्रमण करत ही लेखिका अत्यंत निराळा असा समर्थ स्त्रीत्वाचा दाखला आपल्या लेखणीवाटे सादर करते. त्यांच्या लेखणीचा प्रवास 'लामा'(१९५०) या कथेपासून सुरु होतो. त्यांनी कथा, कादंबरी, कविता, स्मृतिलेख, आत्मकथनात्मक लेखन, प्रवास वर्णन असे विविध साहित्य प्रकार मोठ्या सामर्थ्याने हाताळले आहेत.

डार से बिछुड़ी(१९५५), ज़िंदगीनामा(१९७९), ए लड़की(१९९१), मित्रो मरजानी(१९६७), यारोंके यार, तिन पहाड(१९६८), बादलों के घेरे(१९८०), सूरजमुखी अंधेरे के (१९७२), दिलो दानिश(१९९३), हम हशमत(१९७७,१९९९), समय सरगम(२०००) या त्यांच्या साहित्यकृती उल्लेखनीय कलाकृती ठरल्या आहेत. २००७ मधील जैनी मेहनबान सिंह या कादंबरीत त्यांनी देश-विदेश यातील संमिलन चित्रित करण्याचा प्रयत्न केला आहे. यापैकी जिंदगीनामा ही कादंबरी १९८० सालच्या साहित्य अकादमी पुरस्काराची मानकरी आहे.

१९८०चे दशक हे एकूणच जागतिक पातळीवरून स्त्री - प्रज्ञेच्या संदर्भातून स्त्रीवाद या अवतरलेल्या संज्ञेच्या संदर्भातून महत्वाचे दशक आहे. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्राचे स्त्रीवादी वाचन हे दशक प्रमाणित करते. आपण चित्रित स्त्री अनुभूतींच्या संदर्भातून विचार करू लागलो की तिथे दोन प्रवाह आपल्या समोर उभे राहतात. पहिला प्रवाह अगदी १९१० ते ५० च्या दरम्यान आकारलेल्या प्रवृत्तीचा आणि दुसरा साठोत्तरी प्रवृत्तीचा. साठोत्तरी प्रवाहातून पुढे निघालेले स्त्री लिखित साहित्यातील संवेदन पुढे अंतरराष्ट्रीय स्त्री वर्ष (१९७५) आणि दशक या टप्प्याशी निगडित झाल्यावर तिथे 'ट्रेंड' ही वस्तुस्थितीही टाळता येत नाही. पण दुर्गा भागवत काय किंवा कृष्णा सोबती काय या लेखिकांनी विविध आयामानी युक्त सखोल जाणिवेची दुनिया प्रत्यक्षात अनुभवलेली असल्यामुळे त्यांना स्वतःला कोणत्याही विशिष्टतेत वाचकांना गुंतविलेले रुचणार नाही. या पार्श्वभूमीवरून विचार करता

पन्नासच्या दशकापासून ते आजच्या विद्यमान - आधुनिकोत्तर काळातही कृष्णा सोबती यांच्या लेखणीचे सक्रीय असणे ही स्त्री संदर्भातूनही अनेक अर्थाने विशेष उपलब्धी ठरते.

त्यांनी प्रामुख्याने आपल्या लेखणीला नैसर्गिकपणे स्त्री अनुभव विश्वातच संचार करायला लावले आहे, त्यामुळे 'स्त्री' हा घटक येथे कोणकोणत्या संवेदनांनी, जाणिवांनी , विशेष सामर्थ्याने युक्त बनतो, कोणत्या विशेष भानाच्या विश्वात या घटकाचा प्रवेश होतो, ते पाहण्याचा अवसर आपल्याला लाभतो. प्रस्तुत लेखिका स्त्री जीवनानुभूती बरोबरच आपल्या देशाच्या सर्वाधिक संवेदनशील प्रश्नाने; हिंदुस्थान - पाकिस्तान फाळणीच्या संघर्षाच्या अवकाशात थेट पोळलेली लेखिका आहे. त्यामुळे त्यांच्या चित्रणाला अधिक व्यापकतेची समृद्धी लाभली असल्याचे अधोरेखित करावे लागेल. त्यांनी आपला प्रवास कोणत्याही प्रस्थापित संकल्पनांच्या आहारी न जाता, रूढ संकेतांच्या प्रभाव व पगड्याखाली न येता स्वायत्त, स्वयंसिद्ध स्वरूपात केलेला आहे. जीवनानुभूतींचे प्रस्थापित सीमा पार करणारे सखोल चिंतन तर येथे ओंजळीत येतेच शिवाय हिंदी, पंजाबी, उर्दू, हरियाणी इ. अनेक भाषांच्या अनोख्या संगमातून अस्तित्वात येणाऱ्या एका अद्भुत विश्व निर्मिती प्रक्रियेचाही प्रत्यय येतो. स्त्री म्हणून (किंवा पुरुष म्हणूनही) आपल्याला दिल्या गेलेल्या किंवा आपल्या वाट्यास आलेल्या ठरावीक जीवनाच्या सीमा ओलांडून आपल्या आंतरिक शक्तीच्या बळावर आपली एक अत्यंत अनोखी अशी भक्कम दुनिया निर्माण करण्याची प्रेरणा हीच त्यांच्या साहित्याचा स्थायीभाव असल्याचे दिसते.

आपल्या जन्मभूमीशी खोलातून एका विशेष मजबुतीने बांधलेले असणे हे भारतीयपणाचे वैशिष्ट्यही कृष्णा सोबती यांच्या लेखणीला निराळा आयाम देऊन जाते. त्यांच्या साहित्याने स्त्रीवादी व्युहांना साजेल असे स्त्री जीवनाचे स्वतंत्र आविष्कार प्रस्तुत केले आहेतच पण त्यामध्ये जी एक विलक्षण ताकद साकारली तिचा स्रोत त्यांच्या भोवतालच्या देश पातळीवरील राजकीय वास्तवात आहे असे वाटते. जन्मभूमीचा त्याग आणि सासर या घटकाचा संघर्षशील स्वीकार ही पुढ्यात असलेली भारतीय स्त्री जीवनानुभूती आणि त्या दिवसांच्या वाट्यास आलेली राजकीय फाळणी या वास्तवाची सांगड म्हणजे कृष्णा सोबती असे म्हटले तर ते चुकीचे होऊ नये.

दुर्गा भागवत यांच्या प्रमाणेच कृष्णा सोबतीही स्वतः एक सक्षम स्त्री असण्याचे उदाहरण आहेत. दुर्गा भागवत जसा वर्तमान क्षण ओंजळीत घेऊन त्यास दृकप्रत्ययात्मकतेतून भिडण्याचा प्रयत्न करत असत तसाच कृष्णा सोबतीही प्रयत्न करतात आणि भागवत यांच्याच मार्गावरून पुढे नेटाने चालत जाऊन स्त्रीचे अस्तित्व प्रस्थापित आकारांतून सोडवून निर्भर अशा माणूस म्हणून असणाऱ्या जगण्याशी जोडून देतात. एकोणिसाव्या शतकाच्या पार्श्वभूमीवरील संपूर्ण विसाव्या आणि एकविसाव्या शतकाच्या पहिल्या तपामधून आपली वाटचाल करणाऱ्या त्यांच्यातील सूक्ष्म, सक्षम अशा स्त्रीत्वाला (आंतरिकतेला) त्या आपल्या जीवनानुभूतीशी थेट संवाद साधायला लावतात. त्या संवादातून आपला स्वाभिमान, आत्मप्रत्ययातून निर्माण होणारा आत्मविश्वासाने विनटलेला तो आत्माभिमान कसा असावा आणि तो आपण आपले जीवन जगताना कसा ओंजळीत घ्यावा ते सांगणारी प्रात्यक्षिके साहित्यकृतींवाटे त्या सादर करतात. सभोवताली पसरलेल्या वास्तवाच्याच माध्यमातून आपल्या साहित्यकृतींमध्ये स्त्री मनात दृढ असणारी प्रस्थापित एकाकीपणाची भावना हाताळतात. त्या एकाकीपणास सामर्थ्याने कलाटणी देत आधुनिक भारतीय स्त्रीच्या नव्या समर्थ जगण्याच्या वाटा आविष्कृत करण्याचा प्रयत्न त्या करतात. समाजाने स्त्री-पुरुषांचे जीवन विशिष्ट सांस्कृतिक आकारांनी प्रमाणित केलेले असते. पती-पत्नी, माता-पिता, बहिण-भाऊ या प्रकारचे ठरावीक ठरावीक आकारच समाजाच्या आकलन कक्षेत सामावलेले असतात. त्यांच्या अलिकडे पलीकडे माणूस नावाची काहीएक भूमिका असू शकते हेच आपल्या समाजाला कळणे कठीण असते. प्रस्थापित सरसकट एकाच पद्धतीचे जीवनाचे आकार समाजात प्रमाणित असणे योग्य नाही तर प्रत्येकास नैसर्गिक प्रकृती लाभलेली असते त्या नुसार ज्याला त्याला आपल्या जीवनास सांस्कृतिक आकार देता येणे महत्त्वाचे होईल, हे स्वतंत्र आकार भ्रष्ट झालेल्या जगण्यास तसेच अतिरेकी स्वार्थांध व्यक्तिवादी प्रवृत्तीस रोख बसवू शकतील या नव्या जाणिवा त्यांच्या कथावस्तू निर्माण करतात.

त्यांच्या प्रत्येक साहित्यकृतीचा समाजाशी थेट संबंध पोहचतो. स्त्रीचे अस्तित्व शोधत असताना सभोवतालाशी, तिथे रुजलेल्या वृत्ती-प्रवृत्तींशी ही लेखिका संवाद साधत राहते. त्या संवादातूनच त्यांच्या चित्रित व्यक्तिरेखांना आकार लाभत जातो असे त्यांनी प्रकर्षाने नमूद करून लेखकाच्या साहित्यकृती त्याच्या एकांतवासातून अथवा त्याच्या स्वतंत्र अवकाशातून निर्माण होतात या म्हणण्यावर निराळा प्रकाश टाकला आहे. साहित्यकृती चित्रित करते ती दर्शने समाज जीवनाशी, तेथे प्रस्थापित असणाऱ्या संकल्पना व संकेत व्यवहारांशी, पारंपरिकतेने चालत आलेल्या रूढ व्यवहारांशी संवादित स्वरूपाची असतात, चित्रित जीवन व्यवहारांचे स्वरूप हे प्रस्थापित सामाजिक, धार्मिक, राजकीय, सांस्कृतिक, आर्थिक तसेच जैविक व्यवहारांशी झडणाऱ्या संघर्षाचे बदलाच्या संदर्भातून दर्शन घडवत असते याची कृष्णा सोबती यांची लेखणी प्रचिती देते.

कृष्णा सोबती यांच्या लेखणीला अर्थातच पाठबळ आहे ते प्रेमचंद युगाचे. त्यातूनच पुढे जयशंकर प्रसाद सारख्या आधुनिक दृष्टीचा मजबूत धागा देणाऱ्या लेखणीपासून साहित्यात व्यापकता आणि सामाजिकता यांचा अद्वितीय समेट अस्तित्वात आलेला दिसतो. माणसाला दडपून टाकणाऱ्या रूढीग्रस्थतेचे चित्रण नवजागरणाच्या संदर्भातून हिंदी साहित्यात अव्याहतपणे सुरु आहे. सामाजिक विषमतेतून आलेली भयावह विरूपता त्यातूनच अंधःश्रद्धांची जीवनाला व्यापणारी बजबजपुरी या साहित्याच्या चित्रण क्षेत्राच्या केंद्रस्थानी आहे. सामाजिक परिवर्तन आणि व्यक्ती

यांचा परस्पर संबंध प्रकाशात आणण्याचे कार्य करणाऱ्यात प्रेमचंद यांच्या पाठोपाठ जैनेन्द्र, अज्ञेय, यशपाल, रेणु इत्यादी लेखक अग्रेसर आहेत. स्वातंत्र्योत्तर भारतापुढील समस्यांचा अत्यंत सूक्ष्मतेने हिंदी साहित्य वेध घेत आलेले आहे. त्यामध्ये प्रामुख्याने राजेंद्र यादव, मोहन राकेश, धर्मवीर भारती, भीष्म शाहनी, मन्नू भंडारी, उषा प्रियंवदा, निर्मल वर्मा, रघुवीर सहाय, मृदुला गर्ग इ. अनेक आधुनिक हिंदी लेखक बदलत्या काळाचा आवाज आपल्या लेखनातून समर्थपणे प्रकट करत आले आहेत. स्वातंत्र्योत्तर वाटचालीतून पुढे आलेल्या या हिंदी लेखकांमध्ये कृष्णा सोबती हे प्रकर्षाने झळकत असलेले नाव आहे. आधुनिक काळाने प्रस्तुत केलेल्या एका अनोख्या मोकळेपणाची स्त्री संदर्भातून साधायची आविष्कृती साधून लेखिका म्हणून असणारी भारतीय जबाबदारी त्यांनी नेटाने पार पाडली.

प्रामुख्याने त्यांच्या संहिता स्त्रीप्रधान संहिता आहेत. त्यामधून त्यांनी अतिशय धडधडीतपणे भारतीय स्त्रियांच्या पारंपरिक शोषित जीवन पध्दतीवर नवा प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. कृष्णा सोबती यांच्या सारख्या स्त्रीची लेखणी कार्यरत होते तेव्हा स्त्रियांच्या जगण्याला असणाऱ्या पारंपरिक मर्यादा, तिला भोगावे लागणारे मानापमान, तिला करावे लागणारे संघर्ष तर अचूकतेने व्यक्त होतातच पण त्याच बरोबर त्या सर्व वास्तवामागची नेमकी कारणमीमांसा करून त्यातून सुटण्याच्या वाटाही तिथे चित्रित होतात. लेखिकेची आधुनिकता, स्वयंसिद्धता, स्वतंत्रता यांचा प्रत्यय हा वास्तविक वाचनातील एक पर्वणी होय. सोबती स्त्रियांसाठी पूर्वापार चालत आलेल्या पोपटाच्या पिंजऱ्यासारखे जीवन दूर सारून त्या ठिकाणी स्त्री स्वातंत्र्याचे जोरदार समर्थन प्रस्तुत करतात.

त्यांनी काही काळ प्राध्यापकी केली, नंतर त्या पत्रकारितेत कार्यरत झाल्या आणि मग स्वतःला त्यांनी संपूर्ण वेळ लेखनात झोकून दिले. कोणताही पिंजरा स्वीकारणे हे त्यांच्या प्रकृतीत नाही. विवाहही जर पिंजरा होत असेल तर तोही त्यांनी मान्य केला नाही. जगणे आणि लिहिणे यात एकवाक्यता ही नेमाडे यांची नैतिकता त्यांच्यातही मुरलेली आहे. स्त्रीशिक्षण, आर्थिक स्वावलंबन, आत्माभिमान या गोष्टी त्यांच्या नायिकांना महत्त्वाच्या वाटतात. ग्रंथ वाचनाचे महत्त्व जाणणारा परिवार लेखिकेला लहानपणीच लाभला. त्यांचे शिक्षण लाहोर, दिल्ली, शिमला अशा ठिकाणी झाले. त्यांच्यात निर्माण झालेले निधडेपण, स्पष्टवक्तेपण, स्वायत्तपण त्यांच्या मित्रो, पाशो, रत्ती, बुढी अम्मू, महक बानो, अरण्या इ. नायिकांचे वैशिष्ट्य बनते.

डार से बिछुड़ी, ज़िंदगीनामा, मित्रो मरजानी, सूरजमुखी अंधेरे के, जिंदगीनामा, दिलो दानिश, समय सरगम या त्यांच्या कादंबऱ्यांनी काळाची गरज ओळखून आपले योगदान दिलेले आहे. यापैकी डार से बिछुड़ी, ज़िंदगीनामा, मित्रो मरजानी या त्यांच्या कादंबऱ्या प्रादेशिक कादंबऱ्या असून समय सरगम ही कादंबरी सामाजिक कादंबरी आहे. त्यांनी जरी स्त्रियांच्या व्यथा आविष्कृत केलेल्या असल्या आणि प्रादेशिक संस्कृती अत्यंत प्रभावीपणे रेखाटलेली असली तरीही आपल्यावर 'स्त्रीवादी' किंवा 'प्रादेशिक लेखिका' असे शिक्कामोर्तब त्यांना रुचत नाही. वर नमूद केल्यानुसार दुर्गा भागवतांप्रमाणेच कोणत्याही विशिष्ट दृष्टीच्या व्युहात अडकून राहणे त्यांच्या काळाची निकड झालेल्या विशाल सामाजिक प्रवृत्तीस (परकीय सत्तांचा अंमल) मान्य नसावे. मोठ्या प्रमाणात राजकीय आणि सामाजिक परिवर्तनाच्या प्रक्रिया जवळून पाहणारे हे डोळे आहेत. त्यांच्या पार्श्वभूमीला १८५७ च्या बंडात पुरुषांबरोबर झोकून देणाऱ्या झाशीची राणी लक्ष्मीबाई सारख्या तसेच बेगम हजरत महल, देवी चौधुराणी, कित्तूरची राणी चन्नम्मा, मादाम भिकाजी कामा इ. स्त्रिया आहेत. तसेच सामाजिक परिवर्तनातील स्वर्णदेवी यांचे १८८२ मधील थिओसोफिकल सोसायटी व १८८६ मधील सखी समिती, पंडिता रमाबाई यांचे १८९२ मधील शारदा सदन, मद्रास मधील मार्गारेट कजिन्स यांचे १९१७ मधील इंडियन विमेन्स असोसिएशन, १९३५ मधील सरोजिनी नायडू यांचे काँग्रेसचे अध्यक्ष होणे, १९२६ मध्ये स्त्रियांचे मतदानात भाग घेणे, १९३०-३१ सालात, स्त्रियांना बरोबरीचा सन्मान देणाऱ्या गांधीजींच्या हाकेला प्रतिसाद म्हणून आंदोलनात सहभागी होत वीस हजार स्त्रियांचे जेल मध्ये जाणे इ. सारखे वास्तव पाठीशी ठेवणारे कृष्णा सोबती हे नाणे मोठे खणखणीत आहे. मृदुला गर्ग, शिवानी, मन्नू भंडारी, उषा प्रियंवदा, अलका सरावगी, प्रभा खेतान इ. स्त्रीवादी लेखन मोठ्या सामर्थ्याने करणाऱ्या साठोत्तरी लेखिकांमध्ये कृष्णा सोबती मोठ्या धडाडीच्या लेखिका म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यांच्या लेखणी वाटे प्रस्तुत झालेली स्त्री - रूपे पारंपरिक स्त्री जीवनातील दुय्यम स्थानावरील वेदनांतून मुक्ती साकारण्याचा प्रत्यय देतात. स्त्रीच्या स्वतंत्र व्यक्तिमत्वाला प्रतिष्ठित करण्याचा प्रयत्न करतात. त्यांनी चित्रित केलेल्या स्त्रिया समाज आणि ईश्वर या पारंपरिक नियंत्रणाच्या पाशातून पूर्णपणे बाहेर आलेल्या, मुक्तीचा गांभीर्याने विचार देणाऱ्या आहेत. आपल्या हक्कांच्या लढाया लक्षात घेणाऱ्या ह्या नायिका कर्तव्याबाबतही दक्षता दाखवतात.

डार से बिछुडी, बदलोंके घेरे पासून ते समय सरगम या कादंबरीपर्यंत त्यांनी चित्रित केलेल्या नायिका आपल्या स्त्रीत्वाला नव्हे तर आतल्या नारीतत्त्वाला आधी प्राधान्य देताना दिसतात. त्यांच्या नायिका समाजाने लपवून ठेऊ पाहिलेले रहस्य उघड करण्याचा चंग बांधतात. डार से बिछुडी मधील पाशो ही ग्रामीण तरुणी आहे, तिला स्वावलंबी जगणेच माहीत नाही त्यामुळे पुरुषांच्या आधाराने जात तिच्या जगण्याची दशा झाल्याचे चित्र येथे आहे. जिंदगीनामा ही भारत पाकिस्तान विभाजन पूर्व पंजाबचे समग्र जीवन चित्रित करणारी कादंबरी कृषी जीवन चित्रित करते, या परिसरातील ग्रामीण स्त्रिया मनसोक्त प्रेमगीते गातात, वेळप्रसंगी आपले जीवन उधळतातही. ऐ लडकी मधील अम्मू आपली मुलगी तिच्या आत्मसन्मानाच्या रक्षणासाठी पती पासून अलग होते हे नीट समजून घेते आहे. स्त्रीचे आर्थिक स्वावलंबन आणि निर्णयक्षम असणे यांच्यातील अनुबंध नेमके येथे ओंजळीत येतात. स्त्री-पुरुषाच्या सहजीवनात श्रेष्ठ आणि दुय्यम अशी स्थाने अस्तित्वात

असण्याऐवजी एकमेकास पूरकता ही भावना कार्यरत झाली पाहिजे हे येथे अधोरेखित होते. आपला पुरुष निवडण्याचे स्त्रीला स्वातंत्र्य असणे लेखिकेला महत्त्वाचे वाटते. पुरुषापासून मुक्ती किंवा स्त्री विरुद्ध पुरुष असा पवित्रा त्यांच्या नायिका घेताना दिसत नाहीत. मित्रो मरजानी मधील मित्रो या सुंदरीला देहसुखाचे प्रचंड आकर्षणही आहे आणि दुसरीकडे मातृत्त्वासाठी, घरासाठी, कुटुंब प्रेमासाठी आसुसलेलीही ती चित्रित झाली आहे. मित्रो ही स्त्री काम भावनेवर उघड उघड बोलण्यासाठीच प्रसिद्ध आहे. सुरजमुखी अंधेरे के मधील रत्ती ही नायिका बाल्यावस्थेत बलात्काराचे दिव्य वाट्यास आलेली स्त्री. आपण सामान्य स्त्री असण्याची, पुरुषाने आपल्याकडे 'स्त्री' म्हणून पाहावे ही पत प्राप्त करण्यासाठी ती संघर्षात पडली आहे. बलात्काराने तिच्या तनामनावर घातक परिणाम साधलेत, तिच्यातील 'रती'तत्त्व नष्ट होऊ लागल्यामुळे जिवंतपणी मरण सोसत जगणे, जगण्याची क्षमता नष्ट होत जाणे तिला मान्य होत नाही आहे. तिच्या मनावरचा तो डाग पुसला जावा म्हणून ती जंग जंग पछाडते. आपले नारी तत्त्व ती पुन्हा प्राप्त करून पुरुषाबरोबर जगण्याचे निजण्याचे सहज स्वरूपाचे जीवन हेच तिचे स्वप्न आहे. दिलो दानिश या दिल्ली शहरात घडणाऱ्या कथानकातील महक बानो ही स्त्री कृपानारायण नामक वकिलाची रखेल त्याच्या दोन मुलांची आईही झाली. पण एका प्रसंगी तिला आपल्या मुलांचा तरी काय भरोसा असे वाटून जाते आणि ती आपल्याला आईकडून मिळालेल्या स्त्रीधनाची मागणी वकिलाकडे करण्याचे धाडस दाखवते.

पुरुषाच्या भरोशावर स्त्रियांना आपले जीवन जगावे लागणे ही व्यवस्था मान्य नसणारी समय सरगम मधील नायिका आरण्याचे अस्तित्व पुरुषाशिवायचे एकटीचे आहे. ती एकटी जरूर आहे पण एकाकीपणाचा, उदासीनतेचा स्पर्श तिला नाही. कृष्णा सोबती यांची सांस्कृतिक पातळीवरील; सूक्ष्मतेने आपल्या आत्मसन्मानाला उराशी कवटाळत जीवनाला सामोरे जाणारी स्वयंसिद्ध, स्वायत्त, स्वतंत्र स्त्री या कादंबरीत आरण्याच्या रुपात आपण पाहतो. या मनोधैर्य विकसित स्त्रीच्या देहाचे वय होतेय पण तिचे मन म्हातारे होत नाही. वयाच्या सत्तरीतील ही नायिका अविवाहित, उच्चभ्रू लेखिका आहे. आशावादी प्रगतीशील चैतन्याची ती पुतळीच जणू. तिच्या शेजारी ईशान समवयस्क एकाकी उदासीन विधुर राहतो. त्याची मुले परदेशात राहताहेत. आरण्या आणि ईशान या मित्रांमध्ये झडणारे संवाद सांस्कृतिक जीवन व्यवहाराची तळामुळातून चिकित्सा करणारे संवाद आहेत. स्त्रीला दुय्यम स्थानावर ढकलून शतकानुशतकांपासून कौटुंबिक पुरुष सत्ताप्रधान संसाराच्या प्रस्थापित परंपरेत काय चित्र निर्माण झाले? परस्परातील नाती भ्रष्टतेने अंकित बनतात. वास्तविक दौर्बल्य आणि पराकोटीचा स्वार्थ त्यामध्ये कार्यरत असतो. म्हणूनच तर खुद्द जन्मदाते वयोवृद्ध झाल्यावर त्यांचा घरादाराला भार होऊ लागतो ना! तारुण्यातील सुनेला - पुत्राला म्हातारे आईबाप ओझे वाटू लागतात. नायिकेच्या वृद्ध मैत्रिणीच्या नावावर घर असूनही तिच्याच घरात तिला मुक्तपणे वावरताही येत नाही हे चित्रित वास्तव कादंबरीत समाज जीवनातूनच प्रवेश करते. ती आरण्याला सांगते की तिचा मुलगा म्हणतो, आता तू रेशमी साड्या कशाला नेसतेस, तू कॉटन कशाला नेसतेस? त्यावर आरण्याचे उत्तर असते, ह्याचे त्याचे ऐकण्यापेक्षा तुला काय नेसावेसे वाटते तेच तू नेस. याबरोबरच ती असेही सांगते की आता हा चहा तुझ्या खोलीत घ्यायला लावलास, पण चहा झाला की आपण बाहेर हॉल मध्येच बोलत बसू. सत्तांध व्यवस्थेत निर्माण झालेले दुबळे जगणे लेखिकेस मान्य नाही. समाज निर्मित स्त्री पुरुषांनी दृढ झालेल्या जीवनाच्या आकारांतून सुटल्याशिवाय त्यांना आपल्या अंतरातील सामर्थ्ये समजणार कशी? माणूसपणाला हाक जाणार कशी?

या प्रकारे वेगवेगळ्या सामाजिक परिस्थितीत पडलेल्या व्यक्तिरेखांचे चित्रण करून बहुआयामानी युक्त बंडखोर लेखिका कृष्णा सोबती यांनी भारतीय स्त्रीस प्रस्थापित बंधनातून मुक्त होण्याच्या प्रेरणा बहाल केल्या आहेत. स्त्रीने कोणत्याही परिस्थितीत असले तरी आपल्या आत्मसन्मानाची पायमल्ली कोणाला करू देऊ नये, तसे कोणी करत असतील तर त्यातून सुटण्याचा सकारात्मक मार्ग शोधावा ह्या प्रेरणा येथे प्रस्तुत आहेत. वास्तविक प्रस्तुत प्रेरणा केवळ स्त्रियांना उपयुक्त ठरणाऱ्या आहेत असे नाही तर त्या स्त्रियांप्रमाणेच पुरुषासही विकसनाकडे चालवितात. प्रस्थापित व्यवस्थेत आत्मसन्मान दडपणारे सत्तांधतेतून आकारणारे वर्चस्ववादाचे वास्तव जगण्यात पदोपदी भेटत असतेच. प्रत्येकाने आपल्या नैसर्गिक प्रकृतीचा मान राखत कोणाला आपल्या आधीन करून घेणे अथवा आपण कोणाच्या आधीन होऊन राहणे थोपवले पाहिजे या प्रेरणा कृष्णा सोबती यांच्या कथावकाशांतून साकारतात. सांस्कृतिक पातळीच्या नावाखाली चालणारी अनागोंदी त्या धडाडीने निर्देशित करतात.

**–शोभा नाईक,** बेळगांव
sanaik96@yahoo.co.in

### पुढील अंकात...

- १४ एप्रिल डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त विशेष लेख.
- दलित महिला परिषदेतला अनुभव
  - विजेता कुमार, अनुवाद - सरिता आवाड
- ऑनर किलिंग - वृषाली जोशी
- आणि इतर बरंच काही